दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.१२ जानेवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १३९ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 12 January 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 139 | Pages 4 | Rate 4 Rs




# भाजपा सरकारमध्ये अदानींचं साम्राज्य कसं वाढलं?



## राज ठाकरेंनी २०१४ साली अदानींचे साम्राज्य किती होते आणि २०२५ पर्यंत त्यात किती वाढ झाली याची माहिती दिली

### देश विकायला काढला


राज ठाकरेंनी म्हटले की, मुंबई विकायला काढली. देश विकायला काढला. २०२४मध्ये एक व्यक्ती भेटली. लोकसभेनंतर. त्याने जी माहिती दिली त्यानंतर माझे सर्व लोकं माझी रिसर्च टीम कामाला लागली. जे काही झालंय ते आज मी तुम्हाला दाखवणार आहे. मी जे दाखवणार आहे. त्यानंतर भीती नाही वाटली तर या देशात निवडणुका न लढवलेल्याच बऱ्या. फक्त २०१४ मोदी पंतप्रधान झाले तेव्हा मला २०२४ च्या नंतर समजायला लागलं. विधानसभा निवडणुकीच्या आसपास रिसर्च टिमकडून गोष्टी आल्या त्याचा धक्का बसला. आपण बघत नाही. आपण डोळे झाक करतो. हिंदी इंग्रजी टेलिव्हिजन चॅनल ब्लॉक केलंय. कुणी काही दाखवत नाही. दाखवलं तर वरून दट्ट्या येतो. जाहिराती बंद करू. मी भारताचा २०१४ चा मॅप दाखवतो. दाखवा रे.

### अदानींची संपत्ती दाखवली

राज ठाकरेंनी दाखवलेल्या व्हिडिओमध्ये २०१४ साली अदानींचे साम्राज्य काही मर्यादित ठिकाणी होते, मात्र २०२५ पर्यंत अदांनींचे साम्राज्य हे संपूर्ण देशात पसरलेले दिसत आहे, या १० वर्षांच्या काळात शेकडो प्रकल्प अदानींना मिळाल्याचे दिसत आहे. यावर बोलताना राज ठाकरे म्हणाले की, २०१४ ला गौतम अदानी यांचे प्रकल्प किती होते. मोदी पंतप्रधान व्हायच्या अगोदर गौतम अदानी कुठे होते. आता २०२५ ला गौतम अदानी कुठे आहेत. फक्त सरकारच्या आशीर्वादाने. तुम्हाला नाही धक्का बसला तर सांगा मला.

### सगळं अदानीला दिलं

पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले की, हे फक्त १० वर्षांतील आहे. जगात असा एकही माणूस नसेल जो १० वर्षात इतका श्रीमंत झाला. उद्योगपतीने उद्योग करू नये या मताचा मी नाही. इतका दळभद्री नाही. या देशात इतके उद्योगपती असताना एकाच माणसाला सर्व गोष्टी दिल्या. सिमेंट, वीज दिल्या. सिमेंट उद्योगात अदानी कधी नव्हताच. आज देशातील दोन नंबरचा उद्योगपती आहे. सिमेंट महाग केलं तर काही बोलू शकणार नाही. सर्व पोर्ट अदानीला. सर्व विमानतळे अदानीला. उद्या वीज बंद केली तर आपण काही बोलू शकणार नाही. महाराष्ट्रात काय परिस्थिती आहे पाहा. असं म्हणत सरकारची व आदानीची पोल खोल केली आहे.






दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला आहे. आज शिवाजी पार्कवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना तसेच शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांकडून प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. आजच्या या सभेत मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले. याआधी अनेकदा भाजपने उद्योगपती गौतम अदांनींना मोठ्या प्रमाणात उद्योग दिले असा आरोप होत होता. आता राज ठाकरेंनी २०१४ साली अदानींचे साम्राज्य किती होते आणि २०२५ पर्यंत त्यात किती वाढ झाली याची माहिती दिली आहे.

राज ठाकरे यांनी प्रत्येक वर्षी महाराष्ट्रात अदानीचा उद्योग कसा निर्माण झाला हे दाखवलं आहे. यानंतर बोलताना राज ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्रात २०१४ ला अदानीचा एका ठिकाणी उद्योग होता. २०२५ पर्यंत जवळ जवळ सर्व महाराष्ट्रात उद्योग झाले.ही महाराष्ट्राची स्थिती. एमएमआरमध्येही काय केलं पाहा. तुम्हाला कसं आवळलं जातंय. हे काय चाललंय ना माहीत आहे का. राज ठाकरेंनी सरकार व गौतम अदानीची पोलखोल केल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राला हादरा देणारी सत्यता बाहेर काढली आहे .

## मकर संक्रांतीपूर्वी पाचोऱ्यात नायलॉन मांजावर घाव
## ६ हजारांचा साठा जप्त, ७० वर्षीय महिलेविरुद्ध गुन्हा

दैनिक वादळ वार्ता
**जळगाव । जितु इंगळे**




मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर पाचोरा शहरात नायलॉन मांजाच्या अवैध साठा व विक्रीविरोधात पोलिसांनी कडक कारवाई सुरू केली आहे. पर्यावरण, पक्षीजीवन तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेस गंभीर धोका निर्माण करणाऱ्या नायलॉन मांजावर कारवाई करत पोलिसांनी सुमारे ६ हजार रुपये किमतीचा साठा जप्त केला असून एका ७० वर्षीय महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.रसुलनगर बाहेरपुरा परिसरात नायलॉन मांजाची बेकायदेशीर विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती पाचोरा पोलिसांना मिळाल्यानंतर तातडीने छापा टाकण्यात आला. या छाप्यात रहिनाबी शेख सत्तार (वय ७०) हिच्याकडून चक्री रीलसह नायलॉन मांजाचा साठा हस्तगत करण्यात आला. घातक नायलॉन मांजामुळे दरवर्षी अनेक पक्षी, पशुधन तसेच दुचाकीस्वार जखमी व मृत्युमुखी पडत असल्याच्या घटना घडत असल्याने पोलिस प्रशासनाने या प्रकाराविरोधात शून्य सहनशीलतेची भूमिका घेतली आहे.या प्रकरणी संबंधित महिलेविरुद्ध भारतीय दंड संहिता, पोलीस अधिनियम तसेच पर्यावरण (संरक्षण) अधिनियमाअंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर-पवार, पाचोरा उपविभागीय पोलीस अधिकारी बापू रोहम व पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.कारवाईत पोलीस उपनिरीक्षक कृष्णा घायाळ, श्रीकांत गायकरवाड, पो.कॉ. हरिप्रसाद परदेशी, संदीप भोई, अनिल पवार व पो.कॉ. प्रिया आहेर यांनी सहभाग घेतला. पुढील तपास महेंद्र पाटील हे पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.नागरिकांची सुरक्षितता, पर्यावरण संरक्षण व पक्षीजीवनाच्या रक्षणासाठी नायलॉन मांजाच्या साठा व विक्रीविरोधात अशाच कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पाचोरा पोलिसांनी दिला आहे.

## मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे येणाऱ्या साठी १२ जानेवारीला टोलमाफी द्या
### खा.बजरंग सोनवणे यांची केंद्र व राज्याकडे मागणी

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त दि. १२ जानेवारी २०२६ रोजी मातृतीर्थ सिंदखेडराजा (ता. सिंदखेडराजा) येथे होणाऱ्या भव्य कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर त्या दिवशी येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व वाहनांना टोलमाफी देण्यात यावी, अशी मागणी बीड लोकसभा मतदारसंघाचे खा. बजरंग सोनवणे यांनी केली आहे.यासंदर्भात खासदार सोनवणे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे (चडठऊउ) व्यवस्थापकीय संचालक यांना सविस्तर पत्र पाठवून तातडीने आदेश काढण्याची विनंती केली आहे.



पत्रात नमूद केल्याप्रमाणे, राजमाता जिजाऊ जयंती अत्यंत श्रद्धा व उत्साहात साजरा केली जाते. या पावन प्रसंगी बीडसह मराठवाडा व राज्याच्या विविध भागांतून लाखो नागरिक, महिला मंडळे, युवक तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सिंदखेडराजा येथे दाखल होतात. त्यामुळे त्या दिवशी महामार्गांवर प्रचंड वाहतूक वाढते.या पार्श्वभूमीवर कार्यक्रमासाठी येणाऱ्या भाविकांना कोणत्याही प्रकारचा वाहतुकीचा अडथळा निर्माण होऊ नये, तसेच वाहतूक सुरळीत व सुरक्षित राहावी, यासाठी १२ जानेवारी २०२६ रोजी मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व खासगी वाहने, एसटी बसेस, चारचाकी व इतर वाहनांना टोलमाफी देण्यात यावी, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे. टोलमाफीमुळे नागरिकांना आर्थिक दिलासा मिळेल, टोलनाक्यांवरील गर्दी कमी होईल आणि वाहतूक व्यवस्थापन अधिक सुलभ होईल, असेही खासदार सोनवणे यांनी पत्रात नमूद केले आहे. त्यामुळे या संदर्भात तातडीने आवश्यक आदेश निर्गमित करावेत, अशी विनंती त्यांनी संबंधित यंत्रणांकडे केली आहे.

## सावधान! नायलॉन मांजा वापरणे पडले महागात; तळोधात तरुणावर गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर बंदी असलेल्या नायलॉन (चायनीज) मांजाचा वापर करणाऱ्यांविरुद्ध तळोदा पोलिसांनी आता कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. शहरातील मोठा माळी वाडा भागात प्रतिबंधित मांजा वापरून पतंग उडवणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, त्याच्याकडून नायलॉन मांजाची चक्री जप्त करण्यात आली आहे.याबाबत मिळालेल्या माहितीनुसार तळोदा शहरातील माळी मंगल कार्यालयासमोर मयूर वासुदेव बोरसे (वय २१) हा तरुण सार्वजनिक ठिकाणी नायलॉन मांजाचा वापर करून पतंग उडवत असल्याची माहिती पोलिसांच्या निगराणी पथकाला मिळाली. हा मांजा मानवी जीवितास तसेच पशू-पक्ष्यांसाठी अत्यंत घातक असल्याने, पोलिसांनी तात्काळ कारवाई करत ८०० रुपये किमतीची काळ्या नायलॉन मांजाची चक्री जप्त केली.

या प्रकरणी पोलीस शिपाई तुकाराम पायला वसावे यांच्या फिर्यादीवरून आरोपीवर भारतीय न्याय संहिता कलम २२३, २९२, २९३ आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ५ व १५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक राजन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अकील पठाण, निलेश साळी आणि त्यांच्या पथकाने केली.तळोदा पोलीस मागील एका महिन्यापासून शहरात जनजागृती मोहीम राबवत आहेत. नायलॉन मांजा विकणाऱ्या दुकानांची दररोज तपासणी केली जात आहे. तरीही काही नागरिक छुप्या पद्धतीने याचा वापर करत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.**नायलॉन मांजा हा जीवघेणा आहे. तो कधीही नष्ट होत नाही आणि त्याचे धागे पक्षी तसेच दुचाकीस्वारांसाठी फास ठरू शकतात. सण आनंदाने साजरा करा, पण कोणाचा जीव धोक्यात टाकू नका. असे आवाहन तळोदा पोलीस प्रशासनाकडून करण्यात येत आहे.**



# संपादकीय

## अरवलीची आरोळी

गौण (आणि अर्थातच मौल्यवान) खनिजामागे साऱ्या जगाची अर्थव्यवस्था धावू लागली आहे. उद्याच्या अर्थव्यवस्थेचा तोच कणा असेल, असं अर्थतज्ज्ञ जोरजोरात सांगत आहेत. विविध खनिजद्रव्य, त्यातून मिळणारे धातू आणि बांधकामांसाठी लागणाऱ्या साहित्यासाठी भारतात सर्वत्र डोंगर आणि टेकड्यांचं वेगात खोदकाम सुरू आहे. त्याच्या पर्यावरणीय परिणामाची चर्चा सुरू असतानाच राजस्थानात अरवली पर्वताच्या खोदकामाविरोधात मोठा असंतोष संघटित झाला आहे. या असंतोषाने रौद्ररूप घेण्याआधी त्याचं गांभीर्य सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आलं आणि त्यांनी साधारण महिन्यापूर्वी दिलेल्या आपल्याच आदेशाला सोमवारी स्थगिती दिली. अरवली पर्वताची व्याख्या आणखी विचारपूर्वक करण्याची गरज असून या विचारमंथनतज्ज्ञ आणि पर्यावरणवाद्यांनाही सामील करून घेतलं पाहिजे, असं सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील न्यायमूर्ती जे. के. महेश्वरी आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांनी स्पष्ट केलं. केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या प्रदत्त समितीचा आणि याच क्षेत्रातील सरकारी संस्थांनी दिलेला अहवाल अपुरा वाटत असल्याने या संपूर्ण प्रश्नाचंच पुनरावलोकन करण्याची गरज न्यायमूर्तींनी परवा व्यक्त केली, हा यातला महत्त्वाचा भाग आहे. खनिज संपत्ती काही दोन-चारशे वर्षांत तयार होत नाही. त्यामुळे तिचा वापर अत्यंत जबाबदारीने, काटकसरीने, भविष्यातील परिणामांचा विचार करून केला पाहिजे. नफेखोरी हाच उद्देश असलेले एवढा सम्यक विचार करण्याची शक्यता जवळपास नसते. त्यासाठी अशा सर्व संवेदनशील क्षेत्रांत नियामक यंत्रणांची योजना केली आहे. पण, नियामक यंत्रणाच हितसंबंधीयांच्या प्रभावाखाली निर्णय घेऊ लागतात, तेव्हा न्यायालयांना हस्तक्षेप करण्याची वेळ येते. अरवली प्रकरणी न्यायालयाचा आधीचा हस्तक्षेप अपुऱ्या माहितीवर आधारित असल्याने आता अधिक खोलात जाऊन दखल घेण्याची गरज न्यायालयाला भासली आहे. न्यायालयाची या प्रकरणातील कृती भविष्यात अशा प्रकरणांत अत्यंत दिशादर्शक ठरणार आहे.

गुजरातमध्ये अहमदाबादजवळ सुरू होणारी अरवली पर्वतरांग राजस्थान, हरियाणा राज्यांतून ६७० किलोमीटरचं अंतर कापून दिल्लीजवळ थांबते. या रांगेचं सर्वोच्च शिखर माउंट अबू. उंचीला फार नसली तरी विस्तीर्ण पसरलेली ही पर्वतरांग देशातली सर्वात जुनी पर्वतरांग मानली जाते. तिचं वय साधारण दोन अब्ज वर्षे आहे! बांधकामांसाठी वापरले जाणारे रंगीबेरंगी, विशिष्ट धाटणीचे दगड याच पर्वतरांगांमध्ये मुख्यतः आढळतात. देशातलं सिमेंटचं सर्वाधिक उत्पन्न याच पर्वतरांगांच्या जीवावर होतं. त्यासाठी या पर्वतरांगांचं गेली अनेक वर्षे प्रचंड उत्खनन सुरू आहे. पर्यावरणीय घटकांचा विचार करणारा भारत हा जगातील सर्वात असंवेदनशील देश असल्यामुळे जगात ज्या उद्योगांवर निर्बंध किंवा बंदी आहे, ते येथे सुखेनैव चालतात. अशा निसर्ग संपत्तीची आपण निर्यात करतो. ती करणाऱ्यांना उत्कृष्ट निर्यातीची पारितोषिकंही दिली जातात! अरवलीच्या कुशीत जी उत्खननं सुरू आहेत किंवा जे डोंगर- टेकड्या भुईसपाट झाल्या आहेत, त्या नजीक अधिक उत्खननाला परवानगी देण्याचा प्रश्न आला आणि ती देताना या पर्वताची जी नवी व्याख्या करण्यात आली, त्यामुळे हा विषय चव्हाट्यावर आला. अरवली पर्वतरांगांमधील बहुतेक डोंगर - टेकड्या १०० मीटरपेक्षा कमी उंचीच्या आहेत, असं पर्यावरणतज्ज्ञांचं म्हणणं आहे. सरकारच्या उच्चाधिकार समितीने जिथे पर्वतरांगांची उंची १०० मीटरपेक्षा कमी (म्हणजे साधारण ३० मजल्यांपेक्षा कमी) असेल आणि जिथला उतार तीन डिग्रीपेक्षा कमी असेल तिथे उत्खननास किंवा खोदकामास हरकत नाही, अशी भूमिका पूर्वी न्यायालयासमोर मांडली होती. हा निकष मान्य केला, तर पर्वतरांगेतील ९० टक्के भागाचं संरक्षण होतं, असंही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आलं होतं. त्यामुळे, न्यायालयाने त्याला सहमती दर्शवली. पण, काही संस्था आणि पर्यावरणवाद्यांनी या निकषाला आक्षेप घेतला, त्यातील मखलाशी फेरयाचिकेद्वारे न्यायालयासमोर मांडली, तेव्हा त्यात तथ्य वाटल्याने न्यायालयाने आता तज्ज्ञांच्या स्वतंत्र समितीची कल्पना मांडली असून पुढील सुनावणी २१ जानेवारीला ठेवली आहे. अरवली पर्वत म्हणजे काही सलग भिंत नाही. त्याचं पर्यावरणीय महत्त्व त्यापेक्षा कितीतरी मोठं आहे. सिकर आणि झुनझुनू या दोन जिल्ह्यांत या रांगेची उंची अवघी ४० ते ६० मीटर आहे. पण, थर वाळवंटाला पूर्वेकडे पसरण्यापासून या रांगांनीच रोखलं आहे. उत्खनन झाल्याने अलवार आणि महेंद्रगडच्या डोंगरांची उंची आधीच कमी झाली आहे. अलवार ते भिवडी हा वन्य प्राण्यांचा पट्टा आहे. सरिस्कातून येणारे वाघ, बिबटे याच मार्गाने प्रवास करतात. हा मार्ग नवी उत्खननं आणि बांधकामांनी विस्कळीत झाला, तर आज महाराष्ट्रात जी परिस्थिती आहे, तीच तिकडे होईल. न्यायालयाने आधी मान्य केलेला १०० मीटरचा निकष अमलात आला, तर उदयपूर आणि चितोडगडचाही बराच भाग उद्ध्वस्त होईल, असं स्थानिकांचं म्हणणं आहे. त्यासाठी रस्त्यावर उतरण्याची तयारी त्यांनी चालवली आहे. संपन्न जैवविविधता, दिल्ली आणि लगतच्या परिसरासाठी असलेले जलोद्भव, धुळीची वादळं रोखण्यासाठी नैसर्गिक आडोसा हे अरवलीचे नैसर्गिक फायदे आपण गमावू, अशी भीती त्यांना वाटते. प्रदूषण नियंत्रण, नैसर्गिक जलसंधारण, स्थानिक हवामानाचं संतुलन, वन्य प्राण्यांची प्रचंड मोठी परिसंस्था यातून नष्ट होईल, असं त्या परिसरातील सगळेच पुन्हा पुन्हा सांगत आहेत. न्यायालयापर्यंत त्यांचं म्हणणं गेलं आहे. केवळ भूमिती न पाहता भूरूप शास्त्रानुसार या प्रश्नाचा विचार झाला, तर निसर्गसंपन्न देशातला निसर्ग कदाचित वाचेलही!

# वंचित आणि उपेक्षित समाजाला नव्या आर्थिक क्षितिजावर लेखणीतून संघटीत करणारा नायक-प्रा.बालाजी जगतकर

आज माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात आधुनिक भारतात आपल्या लेखनातून आणि सामाजिक कार्यातून वंचित आणि उपेक्षित समाजाला नव्या आर्थिक क्षितिजावर संघटीत करणारा प्रा. बालाजी जगतकर यांच्या जन्म दिवस १२ जानेवारी निमित्त आपण एक मित्र म्हणून त्यांच्या सामाजिक , राजकीय, धार्मिक ,व आर्थिक क्षेत्रातील कामाची मुत्सद्देगिरी बघुन आपण काही तरी लिखाण करावे म्हणून हा लेख लिहित आहे तेव्हा भारतात सर्व प्रथम २० जानेवारी १७८० ईस्ट इंडिया कंपनीचा वरिष्ठ अधिकारी जेम्स हिककी यांनी भारतात पहिले वृत्तपत्र , द बंगाल गंझेट सुरू केले ते भारतात ईस्ट इंडिया कंपनीचा व्यापार वाढवण्यासाठी आणि युवक व शेतकऱ्यांना आपला आर्थिक विकास साधुन भारताला आर्थिक महासत्ता करण्यासाठी हा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून जेम्स हिक्कीने भारतात वृत्तपत्र सुरू केले आणि पुढे १९३५ मध्ये वृत्तपत्र स्वातंत्र्य मिळाले आणि भारताच्या स्वातंत्र्य लढाईत मोठी चळवळ उभी करण्यात वर्तमान पत्राने महत्वाची भूमिका पार पाडली. खरे तर स्वातंत्र्य नंतर वर्तमान पत्राने भारतात सकारात्मक भूमिका घेऊन शिक्षण. रोजगार , व्यापार, प्रशासन , उघोग निर्माण ,इत्यादी महत्वाच्या विषयावर लिखाण करून भारतात आर्थिक क्रांती घडवून आणली पाहिजे होती पण तसे काही होताना दिसले नाही शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा या प्रेरणा तून बोधघेऊन प्रा.बालाजी जगतकर सारखा पत्रकार,संपादकाने बीड अक्षरधाम सारखे वर्तमान पत्र सूरु केले आणि अल्पावधीतच येथील वंचित, उपेक्षित, शेतकरी, महिला, बालकल्याण विषयावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवून या यांच्या अन्याय



अत्याचाराला वाचा फोडून या वंचित आणि उपेक्षित समाजाल नव्या आर्थिक क्षितिजावर संघटीत करण्याची जिद्द चिकाटी व धेय्य समोर ठेवून स्वाभिमानी, मुत्सद्दी व धेय्यवादी धोरण समोर ठेवून भविष्यात वाटचाल करत असलेले अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे संपादक प्रा.बालाजी जगतकर सर होय मनुवादी व्यवस्थाने येथील कल्याणकारी व्यवेस्थाला कायम दुर्लक्ष करून मनमानी कारभार चालवला आहे या व्यवस्थेला, सरकारी अधिकाऱ्यांला , राजकीय पुढाऱ्यांना बारा महिने लेखणीतून आरसा दाखवण्याचे काम करत आहेत. बीड अक्षरधाम व दैनिक वादळवार्ता या वर्तमान पत्राच्या माध्यमातून भविष्यात सहकारी चळवळ उभी करून समाजात संघटन घडवून समाजातील तरुण आणि महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे क्रांतीकारी धेय्य उराशी बाळगून वाटचाल करत असलेले अष्टपैलू व्यक्तिमत्त्व बालाजी जगतकर सर हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना, तरुणांना , आणि महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी नवीन उद्योग धंद्दे उभारुन शेतकरी, महिला, शेतमजूर, वंचित समाजाने नवीन माहिती आणि तंत्रज्ञान, विज्ञान, संगणक, सहकार , ई व्यापार, इत्यादी क्षेत्रात शिक्षण घेऊन नवे उद्योगजग , कारखानदार, निर्माण करण्याचे ध्येय उराशी बाळगून या वंचित आणि उपेक्षित समाजाची व देशाची आर्थिक व औद्योगिक जडणघडण व्हावी असे कल्याणकारी व वास्तविक धेय्य उराशी बाळगून वाटचाल करत असलेले अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे संपादक प्रा. बालाजी जगतकर सर यांना वाढदिवसाच्या निमित्ताने मंगलमय शुभेच्छा देऊ आणि त्यांना उदंड आयुष्य लाभो हीच तथागत गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरणी प्रार्थना करून या धेय्यवादी , स्वाभिमानी मुत्सद्दी अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाला क्रांतीकारी जयभिम...

**-प्रा.लहुदास रोडे,**
**परळी तालुका अध्यक्ष राष्ट्रीय मंजूर कांग्रेस**

# नंदुरबारच्या शेतीला आता 'मधाचा गोडवा'; जिल्हाधिकारी यांनी प्रत्यक्ष मळ्यात उतरून अनुभवली मधमाशांची किमया!

## नंदुरबारच्या 'शुद्ध मधा'साठी जिल्हास्तरीय आराखडा तयार करण्याचे डॉ.मित्ताली सेठी यांचे आदेश; पालिपाड्यात मधुमक्षिका पालन प्रात्यक्षिकाचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्हा आता केवळ मिरची आणि कडधान्यांसाठीच नाही, तर 'नंदुरबार शुद्ध मधा'साठी ओळखला जावा, असा निर्धार जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी व्यक्त केला आहे. नवापूर तालुक्यातील पालिपाडा येथे रबी हंगामातील अजवाइन (ओवा) पिकावर आधारित मधुमक्षिका पालन प्रात्यक्षिक युनिटला त्यांनी प्रत्यक्ष भेट दिली. केवळ पाहणीच न करता, जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः मधपेटी हाताळून आणि यंत्राद्वारे मध काढून उपस्थितांची मने जिंकली.डॉ. हेडगेवार सेवा समिती संचलित कृषी विज्ञान केंद्र आणि 'आत्मा' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात जिल्हाधिकाऱ्यांनी मधुमक्षिका पालनाचे महत्त्व अधोरेखित केले. मधुमक्षिका पालन हे केवळ जोडधंदा नसून ते परागीभवनाद्वारे शेतीतील उत्पादन आणि गुणवत्ता वाढवणारे एक क्रांतीकारक साधन आहे, असे त्यांनी यावेळी नमूद केले.

> **मधुमक्षिका पालनामुळे मध, मेण, रॉयल जेली आणि परागकण यांसारखी मौल्यवान उत्पादने मिळतात. यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील आणि शेती खऱ्या अर्थाने शाश्वत होईल.**
> **- डॉ. मित्ताली सेठी, जिल्हाधिकारी, नंदुरबार**



**नंदुरबार ब्रॅंडिंगवर भर:-**जिल्ह्यातील मध उत्पादनाला जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी काही महत्त्वाच्या सूचना दिल्या ज्यात 'नंदुरबार शुद्ध मध' या नावाने स्वतंत्र ओळख निर्माण करणे.,जिल्ह्यात वर्षभर उपलब्ध असणाऱ्या फुलोऱ्याचे नियोजन करणे., शेतकऱ्यांच्या पिकात परागीभवनासाठी मधपेट्या भाडेतत्त्वावर देण्याची सुविधा सुरू करणे.

यावेळी गुजरातमधील प्रगत मधपालक अस्मिताबेन पटेल, ज्या ६,००० मधपेट्यांतून वार्षिक १५० टन मधाचे उत्पादन घेतात, त्यांनी आपला अनुभव कथन केला. तसेच अहिल्यानगरचे राजू कानवडे यांनी जिल्ह्यात सुरू असलेल्या २०० हून अधिक मधपेट्यांच्या उपक्रमाची माहिती दिली.या उपक्रमामुळे नंदुरबारमधील आदिवासी बहुल भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्याच्या दिशेने एक आश्वासक पाऊल पडले आहे, असा विश्वास कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

# नर्मदा पात्रात मकरसंक्रांतीला भाविकांच्या सुरक्षेसाठी धडगाव पोलीस सज्ज; भुषा येथे ग्रामस्थांची बैठक संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

मकरसंक्रांतीच्या सणानिमित्त नर्मदा नदीच्या किनारी जलपूजन आणि नवस फेडण्यासाठी होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेता, धडगाव पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टीने कंबर कसली आहे. धडगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली भुषा येथे दिनांक १० रोजी सकाळी ११,३० वाजता ग्रामस्थांची विशेष बैठक पार पडली. उत्सवाच्या काळात कोणतीही अनुचित घटना घडू नये आणि भाविकांना सुलभ दर्शन घेता यावे, यासाठी या बैठकीत महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या.



नदीकाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. नर्मदा नदीच्या पात्रात कोणताही धोका उद्भवू नये म्हणून गावातील पट्टीच्या पोहणाऱ्यांची आणि स्वयंसेवकांची यादी तयार करण्यात आली आहे. संक्रांतीच्या दिवशी हे सर्व स्वयंसेवक घटनास्थळी हजर राहून चोवीस तास देखरेख करणार आहेत.

ज्या ठिकाणी भाविक प्रामुख्याने जलपूजन आणि नवस फेडण्यासाठी एकत्र येतात, त्या ठिकाणी नदीच्या किनाऱ्यालगत बांबूचे बॅरिकेटिंग करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे भाविकांना सुरक्षित अंतरावरून पूजन करता येईल आणि खोल पाण्याचा धोका टाळता येईल.

मकरसंक्रांतीच्या काळात परिसरात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस सतर्क झाले आहेत. या काळात परिसरात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे सुरू राहणार नाहीत, याची ग्वाही बैठकीत देण्यात आली. जर कुठेही असे प्रकार सुरू असल्याचे निदर्शनास आले, तर संबंधितांवर तात्काळ कठोर कायदेशीर कार्यवाही केली जाईल, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

बैठक संपल्यानंतर पोलिसांनी भाविकांच्या वाहनांसाठी निश्चित करण्यात आलेल्या पार्किंगच्या जागेची प्रत्यक्ष पाहणी केली. या बैठकीस भुषा,भमाने ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच कुशाल पावरा, माळ ग्रामपंचायतचे सरपंच जाड्या पावरा, उपसरपंच विरसिंग पावरा यांच्यासह १५ ते १६ सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. पोलीस दलातर्फे स्वप्नील गोसावी, पुष्पेंद्र कोळी, जानसिंग वळवी यांनी नियोजनासाठी सहकार्य केले.

# पोटाचा कर्करोग का होतो? पोटाची समस्याही कारण बनते का?

दैनिक वादळ वार्ता

आजकाल पोटाच्या कर्करोगाच्या केसेस सातत्याने वाढत आहेत. जेव्हा पोटातील पेशी असामान्य मार्गाने वाढू लागतात आणि सामान्य कार्यावर परिणाम करतात तेव्हा हा रोग होतो. यामुळे पोटाचे कार्य खराब होऊ शकते आणि आरोग्याच्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. याशिवाय अनेक लोकांमध्ये बद्धकोष्ठता देखील सामान्य झाली आहे, ज्याचा परिणाम पोटाच्या आरोग्यावर होतो. दीर्घकाळापर्यंत बद्धकोष्ठता पोटाच्या कार्यावर परिणाम करते आणि काही प्रकरणांमध्ये यामुळे पोटाचे गंभीर आजार होऊ शकतात.

**पोटाचा कर्करोग का होतो?**

तज्ज्ञ सांगतात की पोटाचा कर्करोग तेव्हा होतो जेव्हा पोटाच्या पेशी असामान्यपणे वाढू लागतात. हे पेशी सामान्यपणे कार्य करत नाहीत आणि हळूहळू ओटीपोटात भिंत किंवा आसपासच्या अवयवांना हानी पोहोचवू शकतात. त्याच्या वाढीमागे अनेक कारणे आहेत. वृद्धत्व आणि कौटुंबिक इतिहास असण्यामुळे त्याचा धोका वाढतो.

सतत तेलकट, मसालेदार आणि प्रक्रिया केलेले पदार्थ खाणे, धूम्रपान आणि अल्कोहोलचे सेवन केल्याने पोटाच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. पोटात एच. पायलोरी बॅक्टेरिया सारख्या संक्रमणांमुळे देखील कर्करोग होऊ शकतो. पोटाची नियमित तपासणी न करणे किंवा सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करणे हा रोग त्वरीत वाढू शकतो. म्हणूनच, वेळेवर चाचणी करणे आणि निरोगी जीवनशैली स्वीकारणे खूप महत्वाचे आहे.

**बद्धकोष्ठतेमुळे पोटाचा कर्करोग देखील होतो का?**

बद्धकोष्ठता पोटाच्या सामान्य कार्यावर परिणाम करू शकते. दीर्घकालीन बद्धकोष्ठता पोटाच्या भिंतींवर दबाव आणते आणि अंतर्गत संसर्गाचा धोका वाढवू शकते. बद्धकोष्ठतेमुळे अन्न बराच काळ पोटात राहते, ज्याचा पोटाच्या पेशींवर वाईट परिणाम होऊ शकतो.सतत बद्धकोष्ठता राहिल्यास गॅस, अपचन आणि फुशारकी यासारख्या समस्याही वाढतात. बद्धकोष्ठतेमुळे थेट पोटाचा कर्करोग होत नसला तरी पोटातील आरोग्याच्या समस्या वाढवून धोका वाढू शकतो. त्यामुळे बद्धकोष्ठतेच्या समस्येकडे दुर्लक्ष करू नका आणि वेळेवर उपाय करा.

# साबला येथील आदर्श सरपंच सौ.जनाबाई नरहरी काकडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

साबला ता.केज येथील ग्रामपंचायत आदर्श सरपंच सौ.जनाबाई नरहरी काकडे यांच्या वाढदिवसानिमित्त साबला येथे शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.रविवार दि.११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी गट साधन केंद्र केजचे गटशिक्षण अधिकारी श्री.सुनील केंद्रे होते तर प्रमुख उपस्थिती मध्ये शिवाजीराव रोडे, पत्रकार डी.डी.बनसोडे, संतोष गालफाडे, दैनिक वादळ वार्ता संपदक अजय भांगे,चंद्रकांत पाटील, दशरथ चवरे,मुब्बशीर खतीब,दत्तात्रय मजमुले, दिनकर जाधव,रविंद्र मेटे, शिव शाहिर बंडु खराटे, शेख अजिमोद्दीन,वली तांबोळी श्रीमती ज्योती सांबरे आदी मान्यवर उपस्थित होते.या उपक्रमा अंतर्गत गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात



आले.याप्रसंगी प्रमुख पाहुणे डी.डी.बनसोडे सर यांनी सरपंच सौ.जनाबाई काकडे यांच्या साबला येथील सरपंच पदाच्या काळात केलेल्या कामाची प्रशंसा केली,वाढदिवसा च्या शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोपात गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,मुलगी शिकली पाहिजे त्यामुळेच शासनाने मुलींचे शिक्षण मोफत केले आहे.मुलीचे वर अठरा वर्षे होईपर्यंत लग्न करु नका,बाल विवाह आपल्या भागात होत असल्याचे दिसून आले तर त्वरीत कळवावे.
यावेळी सरपंच सौ. जनाबाई काकडे व आदर्श शिक्षक नरहरी काकडे यांचा सत्कारमान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिवशाहीर बंडु खराडे यांनी पोवाडा सादर करीत उपस्थितांची मने जिंकली.श्रीमती ज्योतीताई सांबरे व वली तांबोळी यांनीसौ.जनाबाई काकडे यांचा सत्कार केला.या कार्यक्रमासाठी उपस्थित उप सरपंच सौ. कचराबाई सरवदे,ग्राम पंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ,आदर्श शिक्षक सुधीर नाईकनवरे,हनुमंत कटारे,उमाशंकर शिंदे, गणेश कटारे,लखनराऊत, राहुल मुळे,विजयसिंह काकडे,हनुमंत काकडे, रामराजे काकडे,आकाश काकडे,रामराजे शिंदे, रामभाऊ काकडे,हनुमंत परळकर,नजीर काझी, फोटोग्राफर लखन कटारे नेहाल काझी,शिवाजी नाईकनवरे,हनुमंत नाईकनवरे,हनुमंत नाईकनवरे,श्रीमंत नाईकनवरे,महादेव नाईकनवरे,लक्ष्मण मुळे यांच्यासह गावातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन लक्ष्मण काकडे यांनी केले तर आभार नरहरी काकडे यांनी मानले.

## झुंजार पत्रकार संघाच्या तालुका अध्यक्षपदी दशरथ चवरे तर सचिवपदी रमेश इतापे यांची निवड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुका झुंजार पत्रकार संघाची दरवर्षी प्रमाणे याही वर्षी नवीन कार्यकारिणी जाहीर झाली असुन अध्यक्षपदी दशरथ चवरे तर सचिवपदी रमेश इतापे यांची निवड सर्वानुमते झाली.तसेच इतर
पदाधीकाऱ्यांच्या ही निवडी यावेळी करण्यात आल्या.या निवडीचे सर्वस्तरातुन अभिनंदन केले जात आहे.
शेतकरी,गोरगरीब,वंचित घटकांचा आवाज बनून सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी केज येथील झुंजार पत्रकार संघ नेहमीच अग्रेसर राहीला आहे.यावर्षी अध्यक्ष निवडीच्या
बैठकीला मंत्रालय वार्ताहर संघ मुंबईचे




अध्यक्ष श्री.दिलीप सपाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संघातील सदस्य सतीश केजकर, नंदकुमार मोरे,दशरथ चवरे ,रमेश इतापे,दिनकर राऊत,दत्तात्रय हंडीबाग,महादेव दळवे,विनायक ठोंबरे,मुबशीर खतीब,सुमित मोरे, दादासाहेब आगे,ड.निखिल बचुटे यांची उपस्थिती होती.यावेळी दिलीपजी सपाटे यांनी पत्रकारांना महत्वपूर्ण मार्गदर्शन केले तसेच नवनिर्वाचित अध्यक्ष सचिव व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करुन अभिनंदन केले पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.या निवडीचे केज तालुक्यातील सर्व राजकीय पक्ष-पदाधिकारी,सामाजिक संस्था,व्यापारी बांधव व शहरवासीयांकडून स्वागत करण्यात येत आहे.

## सिसा–वडफळीपाडा शाळेचे क्रीडा स्पर्धेत ऐतिहासिक यश; केंद्रस्तरीय महोत्सवात चौफेर विजेतेपद

दैनिक वादळ वार्ता
**मोलगी । (रविंद्र वळवी)**

धडगाव तालुक्यातील सिसा केंद्रांतर्गत आयोजित केंद्रस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, सिसा-वडफळीपाडा येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत विविध क्रीडा प्रकारांत प्रथम क्रमांक पटकावला. शिस्तबद्ध नियोजन आणि उत्साही वातावरणामुळे हा दोन दिवसीय महोत्सव परिसरात विशेष चर्चेचा विषय ठरला.
शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी ६ व ७ जानेवारी रोजी झालेल्या या महोत्सवात केंद्रातील ३० शाळांनी सहभाग घेतला होता. खो-खो, कबड्डी आणि रस्सीखेच या



सांघिक खेळांमध्ये सिसा-वडफळीपाडा शाळेने मोठा व लहान गट अशा विविध विभागांत वर्चस्व सिद्ध केले. तसेच धावण्याच्या स्पर्धेतही शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली.
या यशामागे पदोन्नती मुख्याध्यापक जर्मनसिंग वळवी, कोच लालसिंग वळवी तसेच इतर शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. शाळेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ आणि केंद्रस्तरावरून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## गुरु तेग बहादूर साहिबजींचे विचार समाजजागृतीसाठी प्रेरणादायी–डॉ.मित्ताली सेठी



दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी स्मृती वर्षानिमित्त जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे विचार समाजजागृतीचे प्रभावी माध्यम ठरावे, असे प्रतिपादन केले.
गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य, मानवी हक्क व सहिष्णुतेसाठी दिलेले बलिदान आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. स्मृती वर्षानिमित्त शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध शैक्षणिक व वैचारिक उपक्रम राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# साळेगावचे टमाटे दिल्लीच्या बाजारात

## अवघ्या पाऊण एकरात पाच लाखाचे टमाटे

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

अवघ्या पाऊण एकर जमिनीत ४० ते ४५ टन टमाटे उत्पन्न घेत एका शेतकऱ्याने साडेचार ते पाच लाखाचे उत्पन्न घेतले आहे.केज तालुक्यातील साळेगाव येथील भागवत मुळे या तरुणाने आपल्या वडिलोपार्जित शेतीत पाऊण एकर क्षेत्रावर टमाटे लागवड केली आहे. नर्सरीतून तयार रोपे आणून ती बेडवर माल्चिचिंगवर लागवड केली. तर त्याला ड्रीपच्या माध्यमातून पाणी आणि खताची मात्रा दिली. असेच आधारासाठी बांबू आणि तार लावून बांधणी केली. वेळच्या वेळी खत पाणी आणि किडीचा प्रादुर्भाव जाणवताच योग्य औषधाची फवारणी केली. तसेच मल्चिंगवर लागवड केल्याने तण वाढलेंनाही त्यामुळे खुरपणी करण्याची आवश्यकता पडली नाही. सुमारे अडीच महिन्या नंतर ठाण्याची तोडणी सुरू झाली आहे. सुरुवातीला बाजारात टमाट्याची आवक कमी असल्याने भागवत मुळे यांना ८५० ते १००० रु प्रति कॅरेट प्रमाणे चांगला भाव मिळाला. आता पर्यंत सुमारे ३०० कॅरेट टमाटे विक्री झाली आहे.

टमाट्याची लागवड करणे खूप जोखमीचे आहे. कारण जर योग्य भाव मिळाला नाही तर कधी कधी टमाटे रस्त्यावर फेकून द्यावी लागतात. केलेला खर्च सुद्धा निघत नाही आणि शेतकरी कर्जबाजारी होतो.
– भागवत मुळे, शेतकरी



त्यातून त्यांना सुमारे अडीच लाख रु. मिळाले आहेत. आता नुकतीच तोडणी सुरू झाली असून आणखी सुमारे १७०० किंवा त्यापेक्षा जास्त कॅरेट टमाटे निघू शकतात. दर आठवड्याला तोडणी करावी लागत असून प्रत्येक तोडणीला ७० ते ८० कॅरेट माल निघत आहे. या अवघ्या पाऊण एकर क्षेत्रात त्यांना २०० ते २५० कॅरेट म्हणजेच सुमारे ४० ते ४५ टन टमाट्याचे उत्पन्न मिळू शकते. आता पर्यंत त्यांना लागवड, जमीन तयार करणे, खत, मजूर, फवारणी, औषधी अशा अंतर मशागतीसाठी सुमारे एक ते दीड लाख रु. खर्च आलेला आहे.
_**साळेगावचे टमाटे दिल्लीत**–भागवत मुळे यांचे टमाटे चांगले तजेलदार आणि टवटवीत असून सध्या ते अहिल्यांग्र येथील नारायणगाव येथील व्यापारी खरेदी करून दिल्लीला पाठवीत आहेत. त्यामुळे साळेगाव सारख्या खेड्यातील शेतकऱ्याने पिकविलेले टमाटे आता देशाची राजधानी दिल्लीत जात आहेत.अतिक शेख आणि अमर मुळे यांनी देखील टमाट्याचे चांगले उत्पन्न घेतले आहे. बाजारात ठाण्याला तेजी असताना त्यांना माल विक्री झाल्याने त्यांना चांगले उत्पन्न मिळाले._

## विसापूर कारागृहातील बंदी आता होणार 'मेकॅनिक'

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शिक्षा भोगून बाहेर पडल्यानंतर सन्मानाने जगता यावे, यासाठी विसापूर खुल्या कारागृहातील बंद्यांच्या हाताला आता कौशल्याचे बळ मिळणार आहे. कारागृहातील बंद्यांसाठी दुचाकी व तीन चाकी वाहनांच्या दुरुस्तीचे (मेकॅनिक) प्रशिक्षण सुरू करण्यात आले असून, हे पाऊल त्यांच्या पुनर्वसनासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि जन शिक्षण संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने विसापूर जिल्हा खुले कारागृह (ता. श्रीगोंदा) येथे या उपक्रमाची सुरुवात झाली. या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन सहाय्यक आयुक्त रविकुमार पंतम, जन शिक्षण संस्थानचे संचालक बाळासाहेब पवार व कारागृह अधीक्षक विजय सोळंके यांच्या उपस्थितीत झाले.
जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जात आहे. याविषयी माहिती देताना श्री.पंतम म्हणाले , केवळ शिक्षा भोगणे हा उद्देश नसून भविष्यात त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे हे यामागील उद्दिष्ट आहे. हे प्रशिक्षण पूर्ण केल्यावर बंद्यांना बाहेरच्या जगात वाहन दुरुस्तीचा स्वतःचा व्यवसाय सुरू करता येईल. यासाठी लागणारे आर्थिक पाठबळ विविध शासकीय महामंडळांच्या माध्यमातून मिळवून देण्यासाठी मार्गदर्शनही केले जाईल.श्री.पवार म्हणाले, प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या बंद्यांना शासनाचे अधिकृत प्रमाणपत्र मिळणार आहे. या प्रमाणपत्राच्या आधारे त्यांना 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमा'सारख्या योजनांतून खादी ग्रामोद्योग आणि जिल्हा उद्योग केंद्रामार्फत कर्ज उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे भविष्यात त्यांना कुणाकडे नोकरी मागण्याची गरज पडणार नाही.'कारागृहाची सुधारणा व पुनर्वसन' या ब्रीदवाक्याला अनुसरून हा उपक्रम बंद्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवेल, असा विश्वास श्री.सोळंके यांनी व्यक्त केला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रांती सोनमाळी यांनी केले तर शफाकत सय्यद यांनी आभार मानले. यावेळी कारागृह प्रशासनाचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व प्रशिक्षणार्थी बंदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला बौध्द धम्म दिला आहे तो महान आहे–केंद्रीय शिक्षक सा.ना.भालेराव गुरुजी

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न परमपूज्य बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला जो बौद्ध धम्म दिला आहे तो महान आहे असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक सा.ना. भालेराव गुरुजी यांनी लोहा येथे बी.बी.गायसमुद्रे यांच्या निवासस्थानी धम्मदशना कार्यक्रमांत केले.
लोहा येथील क्रांतिसूर्य बुद्ध विहारात दि. ७ जानेवारी २०२६ पासुन १० दिवशीय श्रामणेर व बौध्दाचार्य प्रशिक्षण शिबीर सुरु झाले असून दि. १० जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता या श्रामणेर संघास वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ मार्गदर्शक महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त बी.बी. गायसमुद्रे यांच्या निवासस्थानी का.सरिता बन्सी गायसमुद्रे यांच्या पित्यार्थ रेखा बन्सी गायसमुद्रे यांच्या वतीने भोजनदान देण्यात आले. यावेळी प्रथम तथागत भगवान गौतम बुद्ध व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न परमपूज्य बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले व





संघाचे जोरदार स्वागत करुन त्रिशरण पंचशील ग्रहण करून बुद्धवंदना घेण्यात आली.
यावेळी माजी नगराध्यक्षा त्रिशलाबाई विक्रम कांबळे, माजी तालुकाध्यक्ष व्हि.के. कांबळे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक वाय बी महाबळे, माजी नगरसेवक उत्तम महाबळे,प्रा. राजेश ढवळे, मिडिया पोलिस सोशल क्लब पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष विलास सावळे,प्रेस फोटोग्राफर विनोद महाबळे,भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक सा.ना. भालेराव गुरुजी, केंद्रीय शिक्षक डी.आय. खेडेकर गुरुजी, कार्यक्रमांचे आयोजक महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त बी.बी. गायसमुद्रे , भारतीय बौद्ध महासभेचे संस्कार जिल्हा उपाध्यक्ष पी.एम. वाघमारे गुरुजी,केंद्रीय शिक्षक धोंडीबा यानभूरे, भारतीय बौद्ध महासभेचे लोहा तालुकाध्यक्ष बापुसाहेब कापुरे, लेफ्टनंट कर्नल संतोष दुन्डे,केंद्रीय शिक्षक तथा सरचिटणीस गिरीश भालेराव,लोहा शहर कोषाध्यक्ष सिध्दार्थ महाबळे, संस्कार सचिव शरद कापुरे, विशाल गायसमुद्रे, सौ.संगिता विशाल गायसमुद्रे,विस्डम कंपनी पुणे चे कार्यकारी संचालक कुणाल बन्सी गायसमुद्रे आदी उपस्थित होते.
यानंतर धम्मदशना देताना पुढे भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक सा.ना. भालेराव गुरुजी म्हणाले की राजगृहाप्रति श्रध्दा बाळगुन पुज्य भंदत व श्रामणेर संघास वंदन करतो. या १० दिवसात तुम्हाला या शिबीरात धम्मदशना ऐकायला जायाला पाहिजे. कुशल कर्म करायला पाहिजे. तुम्ही जेवढे दान द्याल तेवढे तुम्हाला फळ मिळेल असे सा.ना. भालेराव गुरुजी म्हणाले.
तसेच यावेळी बोलताना केंद्रीय शिक्षक डी.आय . खेडेकर गुरुजी म्हणाले की, म्हणाले की, धम्माचे दान हे सर्व दानापेक्षा श्रेष्ठ आहे. धम्माचा रस हा सगळ्या रसापेक्षा चांगला आहे. ज्या माणसाने जीवनात तृष्णा त्यागली त्या माणसाचे जीवन सुखी होते असे तथागत भगवान गौतम बुद्धांनी सांगितले. भगवान गौतम बुध्दाचा धम्म हा मंत्रात नाही तर सुत्रात आहे विज्ञानावर आधारित आहे.संघ हा दानशूर व्यक्तीमुळे पुढे आला आहे. आपल्याला त्रिशरण,पंचशील व २३ प्रतिज्ञा कळाल्यावर भरपूर कळाले. तथागत भगवान गौतम बुद्धांनी सांगितले माणसाच्या कल्याणासाठी धम्म आहे. धम्मासाठी माणुस नाही. प्रत्येक समाजातील व्यक्तींनी जर त्रिशरण, पंचशीलाचे पालन केल्यास कोणतेही तंटे होणार नाहीत पोलिस स्टेशनला जायाची गरज लागणार नाही.परमपूज्य बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २१ वर्ष अभ्यास करून आपल्याला हा धम्म दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे आपल्यात क्रांति झाली आहे.धम्मामुळे आपल्याला वैभव मिळाले आहे असे डी.आय. खेडेकर म्हणाले.

# नगरसेवक पदाची शपथ कृतीतून; गणेशपार प्रभागातील शाळांत डास प्रतिबंधक फवारणी

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना अभिप्रेत स्वच्छ व निरोगी प्रभाग ठेवण्याचा संकल्प घेत परळी नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगरसेवक जयश्री मोगरकर यांनी गणेशपार प्रभागातील शाळा डासमुक्त व्हाव्यात यासाठी फवारणी मोहीम सुरू केली. राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने शाळेतील वर्गखोलीत उल्हसित व सुगंधित वातावरण व्हावे यासाठी भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी सर्व शाळांना सुगंधी फ्रेशनर स्प्रे भेट दिले.

नुकत्याच झालेल्या नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत गणेशपार भागातील प्प्रभाग ५ मधून विजयी झालेल्या भाजपच्या उमेदवार सौ. जयश्री शंकरअप्पा मोगरकर यांनी कामकाजास सुरुवात करत, प्रभागातील सर्व शाळा डासमुक्त करण्याचा संकल्प केला आहे. या अंतर्गत प्रभागातील शाळा स्वच्छ रहाव्यात, विद्यार्थी निरोगी राहावेत यासाठी फवारणी अभियान सुरू केले. प्रभाग ५ मधील भीमनगर भागातील जिल्हा परिषद शाळा, डॉ. जाकेर हुसेन शाळा, वैद्यनाथ विद्यालय प्राथमिक व माध्यमिक शाळा, ज्ञानबोधिनी शाळा व कृष्णाबाई देशमुख शाळेतील वर्ग खोली, परिसर व स्वछता गृह डास प्रतिबंधक फवारणी करण्यात आली. नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष वैजनाथ तात्या जगतकर, मुख्याध्यापक घागरमाळे सर, दिपक जगतकर, संकेत बनसोडे यावेळी उपस्थित होते.वातावरण बदलामुळे परिसरात डासांचा मोठ्या प्रमाणावर वावर झाल्याने विद्यार्थ्यांना आजारांचा धोका वाढल्याचे परिसरातील नागरिकांच्या तक्रारी नगरसेवक मोगरकर यांच्या कडे करण्यात आल्या. याची तात्काळ दखल घेत प्रभागातील सर्व शाळात डास प्रतिबंधक औषधी फवारणी करण्यात आली. शाळेच्या फवारणी नंतर संपूर्ण प्रभागात डास प्रतिबंधक फवारणी करण्यात येणार असल्याचे यावेळी अश्विन मोगरकर यांनी सांगितले. सोबतच सोमवार, दि १२ जानेवारी रोजी होणाऱ्या राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंतीच्या पार्श्वभूमीवर सर्व शाळेतील वर्गखोल्या सुगंधित व्हाव्यात यासाठी भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांच्या तर्फे सुगंधी फ्रेशनर भेट देण्यात आले.

राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल वपशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या सूचनेनुसार परळी शहरात सकारात्मक बदल व्हावेत, शहरातील पर्यावरण चांगले राहावे, शहरातील स्वछता प्राधान्यक्रमाने व्हावी व नागरिकांना निरोगी वातावरण मिळावे यासाठी स्वच्छ व निरोगी प्रभाग ठेवण्याचा संकल्प केल्याचे यावेळी अश्विन मोगरकर यांनी संकल्प केल्याचे सांगितले.



## निंभोरा पोलीस स्टेशनकडून पत्रकार दिनानिमित्त सत्कार सोहळा !

दैनिक वादळ वार्ता
**जळगाव । जितु इंगळे**



पहिले मराठी वृत्तपत्रकार व संपादक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्मदिनानिमित्त ६ जानेवारी हा दिवस राज्यात मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने पत्रकार दिनाचे औचित्य साधत आज निंभोरा पो.स्टे. च्या वतीने परिसरातील पत्रकार यांचा सत्कार, सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रम प्रसंगी आपल्या अध्यक्षीय मनोगतात पत्रकार हा सर्वांचा मित्र असून तो कधीच कोणाचा शत्रु नसतो. पत्रकार , लोकप्रतिनिधि, पोलीस, जनता यांचा नेहमी सुसंवाद असल्यास सहज प्रश्न सुटून नेहमी शांतता जातीय सलोखा राहून न्याय मिळण्यास मदत होऊ शकते. असे प्रतिपादन पो.निरीक्षक श्रीमती मिरा देशमुख यांनी व्यक्त केले.यावेळी सर्व पत्रकारांचा सत्कार पोनि. श्रीमती मिरा देशमुख पो.उप दिपाली पाटील, यांनी शाल, श्रीफळ देऊन सन्मान केला. याप्रसंगी उपस्थित ज्येष्ठ पत्रकार राजीव बोरसे, ज्ञानेश्वर महाजन, प्रवीण धुंदले ,विनायक जहुरे , इकबाल पिंजारी, इद्रिस शेख, कांतिलाल गाढे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.याप्रसंगी अवसरमल सर,भीमराव कोचुरे,सुमित पाटील, प्रभाकर महाजन , जमील शेख,, दस्तगीर खाटीक, राहुल जैन, दस्तगीर खाटिक, , राहुल जैन, विनोद कोळी, उमेश तायडे, जमील शेख, छगन पाटील,संजय पाटील, सरदार पिंजारी यासह मोठ्या संख्येने पत्रकार बांधव .तसेच पो.काँ ,होमगार्ड, कर्मचारी आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ पत्रकार राजीव बोरसे यांनी तर सूत्रसंचालन अमोल वाघ व आभार प्रदर्शन कांतिलाल गाढे यांनी केले.

## मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी.एक्स मार्फत इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ डिप्लोमा इंजीनियरिंग वैराग येथे स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**बार्शी । प्रतिनिधी**




दि.इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ डिप्लोमा इंजीनियरिंग वैराग येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम.सी. एक्सच्या माध्यमातून डिप्लोमाच्या विद्यार्थ्यां साठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पिसाळ डी.आर सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्स चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना फायनान्शियल मार्केट्स, कमोडिटीचे प्रकार, जागतिक स्तरावर सक्रिय असलेल्या कमोडिटीज, वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशन क्ट,कमोडिटी व इक्विटी मध्ये असेल असलेला फरक,डिमॅट अकाउंट तसेच सेबीच्या सारथी प चे महत्त्व विशद करत मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी श्री.एस. एस.झांबरे सर,श्री.सुधीर भोसले सर यांनी विशेष प्रयत्न केले तर सूत्रसंचालन जावेद खान पठाण सर यांनी केले. तसेच या कार्यक्रमास सर्व स्टाफ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रभाग १६ मध्ये नवीन स्ट्रीट लाईट सुरू; नागरिकांकडून समाधान व्यक्त

### नगरसेवक नितीन बागवाले व कादर कुरेशी यांच्या उपस्थितीत स्ट्रीट लाईटचा शुभारंभ

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

परळी नगर परिषद अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक १६ मधील प्रबुद्ध नगर, युसुफीया कॉलनी, राहुल नगर व भीम नगर या भागात नगर परिषदेमार्फत नव्याने बसविण्यात आलेल्या स्ट्रीट लाईट सुरू करण्यात आल्या आहेत. या कामामुळे परिसरात रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश उपलब्ध झाला असून नागरिकांच्या सुरक्षिततेत मोठी वाढ झाली आहे.

परळी नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नगरसेवक नितीन बागवाले व कादर कुरेशी विजयी झाले असून त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रभागातील मूलभूत प्रश्न सोडविण्यास प्राधान्य दिले आहे. याआधी या भागात अपुऱ्या प्रकाशव्यवस्थेमुळे नागरिकांना विशेषतः रात्रीच्या वेळेस अडचणींचा सामना करावा लागत होता. महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी तसेच कामानिमित्त बाहेर पडणाऱ्या नागरिकांसाठी ही गंभीर समस्या होती. नवीन स्ट्रीट लाईट सुरू झाल्याने रस्ते, अंतर्गत मार्ग व वसाहती उजळल्या असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. स्ट्रीट लाईट सुरू करण्यात आल्याच्या वेळी नगरसेवक नितीन बागवाले व कादर कुरेशी उपस्थित होते. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधत प्रभागातील आगामी विकासकामांची माहिती दिली.



या कामासाठी सहकार्य केल्याबद्दल नगर परिषद प्रशासनाचे मुख्याधिकारी, उपमुख्याधिकारी तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नगरसेवक व नागरिकांच्या वतीने आभार मानण्यात आले. प्रशासनाच्या तत्परतेमुळे हे काम वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाल्याचे नमूद करण्यात आले.नवीन स्ट्रीट लाईटमुळे परिसरातील सुरक्षितता, स्वच्छता आणि एकूणच जीवनमानात सुधारणा होणार असून भविष्यातही अशा विकासकामांना प्राधान्य देण्यात येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## बुरंडवाडीत मंगळवारी ह.भ.प.श्रीराम महाराज विडेकर यांचे कीर्तनाचे आयोजन,कै.पंडित भोसले यांच्या प्रथम पुण्यस्मरणाचे औचित्य

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बुरंडवाडी (विडा) येथील डॉ.विश्वनाथराव कराड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील आदर्श शिक्षक कै.पंडित बळीराम भोसले यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित श्रीमद् भागवत कथेची सांगता मंगळवारी दि.१३ जानेवारी रोजी ह.भ.प महंत श्रीराम महाराज विडेकर यांच्या सुश्राव्य कीर्तनाने होणार आहे.गेल्या वर्षभरापूर्वी कै.पंडित भोसले यांचे दुःखद निधन झाले होते. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ बुरंडवाडी येथे गेली सात दिवसांपासून अध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असुन ह.भ.प.पुरुषोत्तममहाराज शास्त्री यांच्या रसाळ वाणीतून श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचेआयोजन करण्यात आले होते.या कथेचा लाभ घेण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली होती.या धार्मिक महोत्सवाची सांगता मंगळवारी दुपारी १० ते १२ या वेळेत ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर,साधू शिवरामपुरी मठ संस्थान विडा यांच्या सुश्राव्य कीर्तनाने होणार आहे. विडेकर



महाराजांचेकीर्तन ऐकण्यासाठी वारकरी सांप्रदायातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.कीर्तन सोहळ्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. कै.पंडित भोसले यांनी डॉ.विश्वनाथराव कराड विद्यालयात सहशिक्षक म्हणून प्रदीर्घ काळ सेवा बजावली होती.त्यांच्या निधनानंतर त्यांच्या कार्याची आठवण म्हणून भोसले परिवाराने हा धार्मिक उपक्रम राबवला आहे.या कीर्तनसोहळ्यास आणि महाप्रसादास जास्तीतजास्त भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन भोसले परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## लोहा शहराचे ज्येष्ठ व्यापारी सोमनाथ (दादा) शंकरराव भोस्कर यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा शहरातील नगरेश्वर मंदिराचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ नागरिक, वारकरी संप्रदायाचे निष्ठावंत अनुयायी तसेच सुप्रसिद्ध व्यापारी सोमनाथ (दादा) शंकरराव भोस्कर यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांनी शांतपणे अखेरचा श्वास घेत वैकुंठवास केला. त्यांच्या अंत्यविधीचा कार्यक्रम दि. १० जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता लोहा येथे शोकाकुल वातावरणात पार पडला.

त्यांच्या निधनाने केवळ भोस्कर कुटुंबावरच नव्हे, तर संपूर्ण लोहा शहरावर शोककळा पसरली आहे.

सोमनाथ भोस्कर हे लोहा शहरातील प्रामाणिक, कष्टाळू व समाजाभिमुख व्यापारी म्हणून परिचित होते. व्यापारी क्षेत्रात त्यांनी प्रामाणिकपणा, सचोटी व विश्वासार्हतेचा आदर्श निर्माण केला होता. त्यांच्या जाण्याने शहरातील व्यापारी बांधवांमध्ये तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.



ते आर्य वैश्य समाजाचे असले तरी त्यांनी कधीही जात-पात अथवा भेदभाव मानला नाही. सर्व समाजांना समान वागणूक देणारे, सर्वधर्मसमभाव जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ते ओळखले जात होते. विशेष म्हणजे *लिंगायत समाजासाठी स्मशानभूमीकरिता १२ गुंठे जमीन दानपत्राद्वारे नगरपालिकेला स्वाधीन करून* त्यांनी समाजसेवेचा आदर्श घालून दिला. त्यांच्या या कार्याचा आजही शहरात गौरवाने उल्लेख केला जातो.

नगरेश्वर मंदिराचे माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी मंदिर विकासासाठी मोलाचे योगदान दिले. धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. शांत, संयमी व मार्गदर्शक स्वभावामुळे ते सर्व वयोगटांमध्ये आदराने पाहिले जात होते.

त्यांच्या पश्चात तीन मुले, मुली,जावाई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मोठे चिरंजीव इंजिनिअर प्रशांत सोमनाथ सावकार भोस्कर तर प्रमोद (दत्तु सावकार) भोस्कर व प्रविण (बंडु) सावकार भोस्कर हे दोन चिरंजीव लोहा शहरात व्यापारी म्हणून कार्यरत आहेत.त्यांच्या निधनाबद्दल भोस्कर कुटुंबीयांप्रती तसेच लोहा शहरातील आर्य वैश्य समाजासह सर्व समाजबांधवांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. अनेक सामाजिक, धार्मिक व व्यापारी संघटनांनी श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. *सोमनाथ शंकरराव भोस्कर यांच्या निधनाने लोहा शहराने एक आदर्श व्यापारी, समाजसेवक, वारकरी भक्त व मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व गमावले आहे.

## नंदुरबारमध्ये संत रामपालजी महाराजांचा जिल्हा सत्संग सोहळा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । प्रतिनिधी**

येथील शाहीर हरिभाऊ मराठा पाटील मंगल कार्यालयात रविवारी संत रामपालजी महाराज यांच्या जिल्हा सत्संग सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास नंदुरबार जिल्ह्यासह शहादा, तळोदा, धडगाव, अक्कलकुवा व नवापूर तालुक्यातील शेकडो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रोजेक्टरच्या माध्यमातून झालेल्या या सत्संगात भक्ती, मानवता, सदाचार व निस्वार्थ सेवेचा संदेश देण्यात आला. यावेळी संत गरीबदासजी महाराज यांच्या जीवनातील प्रसंगांचे विवेचन करत एकाच परमेश्वराच्या भक्तीचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. भौतिक सुखापेक्षा ईश्वरभक्ती आणि सद्गुरूंच्या उपदेशातूनच मानवी जीवनाचे खरे कल्याण होते, असा संदेश देण्यात आला.



सत्संगात संत रामपालजी महाराजांच्या ‘अन्नपूर्णा मोहिमे’अंतर्गत गरजू व आपत्तीग्रस्त कुटुंबांना दिल्या जाणाऱ्या मदतीची माहिती देण्यात आली. या माध्यमातून सामाजिक बांधिलकी व मानवतेचे दर्शन घडल्याने भाविक भावविभोर झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सेवेदारांनी वाहन, चप्पल-बूट व्यवस्था, पिण्याचे पाणी तसेच मार्गदर्शनाची चोख व्यवस्था केली होती. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व भाविकांना अल्पोपहार देऊन या मंगलमय सत्संगाची सांगता करण्यात आली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077